शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८वी

विषय – मराठी (प्रथम भाषा)

घटक 3 – कार्यात्मक व्याकरण

भारांश – 44%　　प्रश्नसंख्या – 11　　एकूण गुण 22

3.3 शब्दांच्या जाती –

अ) अविकारी शब्द – लिंग, वचन किंवा विभक्ती यांमुळे ज्या शब्दांच्या रुपात बदल होत नाही त्याला अविकारी शब्द म्हणतात.

५. क्रियाविशेषण अव्यये – क्रियापदाबद्दल अधिक माहिती देणारा शब्द म्हणजे क्रियाविशेषण होय.

1) कालवाचक क्रियाविशेषण अव्यये – ही अव्यये क्रिया घडण्याची वेळ किंवा काळ दाखवितात.

उदा. आता, आधी, पूर्वी, हल्ली, नेहमी, दिवसभर, दररोज, वारंवार, क्षणोक्षणी.

2) स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये- ही अव्यये क्रिया घडण्याचे स्थळ किंवा ठिकाण दाखवितात.

उदा. खाली, अलीकडे, तिथे, दूर, वरून, सभोवार, तिकडून, तिकडे.

3) रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये - ही अव्यये क्रिया घडण्याची रीत किंवा क्रिया कशी घडते हे दाखवितात.

उदा. फुकट, झटकन, खरोखर, आपोआप, मुद्दाम, टपटप, हळू, नि:संशय.

4) संख्यावाचक/परिणामवाचक क्रियाविशेषण अव्यये- ही अव्यये क्रिया किती वेळा घडली किंवा क्रियेचे परिणाम दाखवितात.

उदा. थोडा, बिलकूल, अतिशय, कमी, जरा, किंचित, पूर्ण, शंभरदा.

६. शब्दयोगी अव्यये- शब्दाला जोडून येणाऱ्या अविकारी शब्दाला शब्दयोगी अव्यये म्हणतात. मागे, पुढे, वर, समोर, पूर्वी, जवळ, नंतर, मध्ये, पर्यंत, बाहेर,समक्ष, संगे,

पैकी, खालून, कडे यांसारखे शब्द शब्दाला जोडून येतात तेव्हा ते शब्दयोगी अव्ययांचे कार्य करतात.

७. उभयान्वयी अव्यये- दोन किंवा अधिक शब्द, अथवा दोन किंवा अधिक वाक्य यांना जोडणाऱ्या अविकारी शब्दांना उभयान्वयी अव्यये असे म्हणतात.

अ) प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्यये- या अव्ययांनी जोडलेली वाक्ये एकमेकांवर अवलंबून न राहता स्वतंत्र्य असतात.

1. **समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यये** – आणखी, आणि, व, शिवाय, आणिक - ही अव्यये पहिल्या विधानात आणखी भर घालतात.
   उदा. विजा चमकू लागल्या आणि पावसाला सुरुवात झाली.
2. **विकल्पबोधक उभयान्वयी अव्यये** – अथवा, वा, किंवा, की - ही उभयान्वयी अव्यये दोन किंवा अनेक गोष्टींपैकी एका गोष्टीची अपेक्षा दाखवतात.
   उदा. तुला ज्ञान हवे की धन हवे?
3. **न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यये-** पण,परंतु,परी, बाकी,किंतु,तरी- ही न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यये असून पहिल्या वाक्यात उणीव, दोष किंवा कमीपण असल्याचे दर्शवितात.
   उदा. आईला थोडे बरे नाही, बाकी सर्व ठीक.
4. **परिणामबोधक उभयान्वयी अव्यये** – म्हणून, सबब, यास्तव, तेव्हा, तस्मात, अतएव – ही परिणामबोधक उभयान्वयी अव्यये असून याद्वारे दुसरे वाक्य हे पहिल्या वाक्याचा परिणाम दाखवते.
   उदा. सायकल वाटेत नादुरस्त झाली; सबब मला उशीर झाला.

अ) गौणत्वसूचक उभयान्वयी अव्यये- यामध्ये एक प्रधान वाक्य व त्यावर अवलंबून असणारे दुसरे गौण वाक्य असते.

1. **स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यये**- यामध्ये प्रधान वाक्याचे स्वरूप गौण वाक्यावरून समजते. उदा. म्हणजे, की, म्हणून, जे.
   एक रुपया म्हणजे शंभर पैसे.
2. **कारणबोधक उभयान्वयी अव्यये**- यामध्ये प्रधान वाक्याचे कारण हे गौण वाक्य आहे हे समजते. उदा. कारण, का की, कारण की.
   त्याला बढती मिळाली कारण त्याने चोख कामगिरी बजावली.

3. **उद्देशबोधक उभयान्वयी अव्यये –** यामध्ये गौण वाक्य हे प्रधान वाक्याचा हेतू किंवा उद्देश दर्शविते. उदा. म्हणून, सबब, यास्तव, याकरिता.
   चांगला औषधोपचार मिळावा म्हणून तो मुंबईला गेला.
4. **संकेतबोधक उभयान्वयी अव्यये –** ही अव्यये संकेत किंवा अट दाखवितात.
   उदा. जर-तर, जरी-तरी.
   प्रयत्न केला, तर फायदाच होईल.

७. केवलप्रयोगी अव्यये-

मनातील आनंदाच्या, दुःखाच्या, आश्चर्याच्या, तिरस्काराच्या इ. प्रकारच्या उत्कट भावना व्यक्त करणाऱ्या उद्गारवाचक अविकारी शब्दाला केवलप्रयोगी अव्यये असे म्हणतात.
उदा. ओहो ! काय सुंदर देखावा आहे हा !

केवलप्रयोगी अव्यय प्रकार :

हर्षदर्शक	वा, वावा, आहा, अहाहा, ओहो, आ-हा.
शोकदर्शक	अरेरे, हायहाय, अगाई, ऊं, अयाई.
आश्चर्यकारक	ओहो, बापरे, अबब, अहाहा, अरेच्चा.
प्रशंसादर्शक	शाबास, वाहवा, छान, ठीक, भारी, भले.
संमतिदर्शक	जी, ठीक, अच्छा, बराय.
विरोधीदर्शक	छे, छट्, छेछे, अंहं
संबोधनदर्शक	अग, अरे, ए, अहो, अगा.
तिरस्कारदर्शक	शीऽ, छी, थुः, हुड, छत.
मौनदर्शक	गप,चिप, चूप.

सराव प्रश्न-

प्र.1 खालील वाक्याच्या आरंभी कोणते केवलप्रयोगी अव्यय येईल?

.... ! असे व्हायला नको होते.

1) बापरे 2) अरेच्चा 3) अरेरे 4) अहाहा

उत्तर – पर्याय 3

स्पष्टीकरण – वाक्यातून दुःखाचे भाव व्यक्त होतात त्यामुळे ‘अरेरे’ हे ‘शोकदर्शक’ केवलप्रयोगी अव्यय योग्य आहे.

प्र. 2. खालील वाक्यात आलेल्या अव्ययाचा प्रकार ओळखा.

टेबलाखाली पुस्तक पडले.

1) क्रियाविशेषण अव्यय 2) शब्दयोगी अव्यय

3) केवलप्रयोगी अव्यय 4) उभयान्वयी अव्यय

उत्तर – पर्याय- 2

Q. R. कोड

प्र. 1 ‘सभोवार गवतफुलांचा ताटवा पसरला होता’. या वाक्यात आलेल्या क्रियाविशेषण अव्ययाचा प्रकार ओळखा. (2025)

1)रीतिवाचक 2) कालवाचक 3) परिमाणवाचक 4) स्थलवाचक

प्र.2 पुढील वाक्यात आलेल्या क्रियाविशेषण अव्ययाचा प्रकार ओळखा.

‘पिटुकली खारुताई घराच्या छपरावरून तुरुतुर गेली.’ (2023)

1)रीतिवाचक 2) कालवाचक 3) परिमाणवाचक 4) स्थलवाचक

प्र.3 पुढील वाक्यात आलेल्या उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.

‘पाऊस कमी पडला बाकी सर्व ठीक आहे.’

1)न्यूनत्वबोधक 2) परिणामबोधक 3) विकल्पबोधक 4) समुच्चयबोधक

प्र.4 पुढील वाक्यात आलेल्या उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा

‘आपणास संपत्ती हवी की सुख हवे?’

1)न्यूनत्वबोधक 2) परिणामबोधक 3) विकल्पबोधक 4) समुच्चयबोधक

प्र. 5 ‘हळूहळू चालत घरी गेला.’ या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात कोणती?

1)रीतिवाचक 2) आवृत्तीदर्शक 3) परिमाणवाचक 4) स्थलवाचक

प्र. 6 पुढील वाक्यात रिकाम्या जागी अचूक पर्याय ओळखा.

..........! काय हे अक्षर तुझे!

1) छी 2) ठीक 3)बराय 4) जी

प्र.7 पुढीलपैकी चुकीची जोडी कोणती?

1) हर्षदर्शक – आहाहा 2) मौनदर्शक – चुप
3)विरोधदर्शक – अंहं 4) शोकदर्शक – अबब

प्र. 8 ‘छे! ते मुळीच शक्य नाही’. या वाक्यातील केवलप्रयोगी अव्ययाचा प्रकार ओळखा?

1) संबोधनदर्शक 2) तिरस्कारदर्शक 3) विरोधदर्शक 4) शोकदर्शक

प्र.9 ‘मुर्खापुढे शहाणपण चालत नाही.’ या वाक्यात आलेला अव्ययप्रकार ओळखा.

1) क्रियाविशेषण अव्यय 2) शब्दयोगी अव्यय

3) केवलप्रयोगी अव्यय 4) उभयान्वयी अव्यय

प्र. 10 ‘राजगुरुंसारख्या अनेक वीरांनी देशासाठी आपले प्राण अर्पण केले’. वरील वाक्यात आलेलले शब्दयोगी अव्यय ओळखा.(दोन पर्याय निवडा)

2) अनेक 2) आपले

3) सारख्या 4) साठी

उत्तरे

1. 4
2. 1
3. 1
4. 3
5. 1
6. 1
7. 4
8. 3
9. 2
10. 3 व 4